# प्रेमविवाह ज्यांना जमत नाही .................

प्रेमविवाह ज्यांना जमत नाही त्यांना कुटुंबियांनी ठरविलेल्या लग्नाला पर्याय नाही. आणि सध्या ज्या प्रमाणात वर्तमानपत्रातील जाहिराती, लग्नविषयक वेबसाईट आहेत ते पाहता ठरवून केलेल्या लग्नांची संख्या कितीतरी अधिक आहे असे वाटते. आणि मी तर अशा ठरवून लग्न करू पाहणाऱ्या शेकडो मुला - मुलींशी बोलत आले आहे.

अशा रीतसर स्थळ पाहून ठरविलेल्या विवाहामध्ये मुलं मुली एकमेकांशी काय बोलत असतील हा नेहमीच माझ्यासाठी कुतूहलाचा विषय ठरला आहे. दोन किंवा तीन मिळणाऱ्या तुटपुंज्या भेटीमध्ये आयुष्यभराच्या जोडीदाराचा निर्णय ते कसा काय घेत असतील? त्यांच्या आयुष्यभराच्या स्पष्ट कल्पना, शारीरिक गरजा, मानसिक गरजा याचा आलेख त्यांना मांडता येत असेल का? त्यांना नेमके काय वाटते ? हे मी कायम तपासात आले आहे. अनेक मुला मुलींना ही “पाहणं बघणं” प्रोसेस अजिबात न पटणारी ! पूर्वी या प्रकारच्या कार्यक्रमांना “ कांदे पोहे “ म्हणायचे. आम्ही आता हा कार्यक्रम ओळखीचा / परस्पर परिचयाचा म्हणतो.( आणि इतरांनीही म्हणावे असे आम्हाला वाटते.)

या कार्यक्रमाबद्दल मी जेव्हा मुलं/ मुलींशी बोलते तेव्हा असं लक्षात आलंय की अशा भेटींच्या बाबत बऱ्यापैकी कॅजुअल अप्रोच आहे. दोघे एकत्र भेटल्यानंतर फॉर्म मध्ये वाचलेल्या माहितीची खातरजमा करण्यातच बराचसा वेळ जातो. आणि त्यानंतर ठराविक प्रश्नोत्तरांची देवाण घेवाण होते. उदा. हॉबीज, भविष्यातले प्लान्स, आवडी निवडी, जॉब प्रोफाइल, स्मोकिंग . ड्रिंकिंग , तुझ्या अपेक्षा काय, माझ्या अपेक्षा काय, तुझा पगार,माझा पगार, याच्या पलीकडे गाडी जात नाही. या सगळ्या प्रकारात देहबोलीला अनन्यसाधारण महत्व येतं. सगळे अचानक देहबोलीचे तज्ञ होऊन अर्थ आणि निष्कर्ष काढतात. त्यामुळे झटकन निर्णय घेण्या ऐवजी संवाद करणे चांगले.

मला एका गोष्टीचं नेहमीच आश्चर्य वाटत आलं आहे. एखाद्या मॉल मध्ये कित्येक मुलं / मुली ८-८ /१०-१० ड्रेस ची trials घेताना वारंवार दिसतात. त्यासाठी ४/५ तास घालवायची त्यांची तयारी असते. हे सगळं करतानाचा त्यांचा पेशन्स वाखाणण्यासारखा असतो. ड्रेस घेताना आपण नेमके कसे आहोत, कोणते रंग आपल्याला शोभतील, त्याचे फिटिंग कसे असेल याचं आपला अभ्यास असतो.तसं जोडीदार निवडताना मी कसं / मी कशी असा माझा काही अभ्यास आहे का? नसेल तर करायला हवा ना ?

आणि अभ्यास मनातल्या मनात नाही करता येत. तेव्हा पुढे काही प्रश्न दिले आहेत, त्यांची प्रामाणिक उत्तरे लिहा किंवा टाइप करून सेव्ह करा.

हे सेव्हिंग लग्नासाठी जरुरीचे आहे.

मी कशी आहे / मी कसा आहे - मला माहित आहे का?

माझ्यामध्ये लवचिकता आहे का? किती?

तडजोड (adjustment)आणि समझौता ( compromise) यातला फरक मला समजतो का?

माझ्या अपेक्षा काय आहेत? ( अपेक्षा म्हणजे तसे असेल तर उत्तम पण थोडा फार फरक असेल तर फारसा काही फरक पडत नाही. ) आणि मागण्या कोणत्या?( मागण्या म्हणजे स्पष्ट आग्रह. इथे माघार नाही...जसं प्रिया सांगते, मुलगा पन्नास हजार पेक्षा जास्त कमावणारा हवाच आणि सिगारेट नकोच. )

काय हवंय मला माझ्या आयुष्याकडून? कुणाच्याही आयुष्यात चढ उतार असतात./ असणार आहेत

त्याला तोंड देताना मला जमेल न? प्रत्येकाच्या जीवनात केव्हाही काहीही अनपेक्षित घडू शकते , यावर माझा विश्वास आहे ना? की माझे सगळे जीवन विनासायास गुडी गुडी असेल अशा भ्रामक समजुतीत मी आहे?

लग्नानंतर काय बदल होणार आहे माझ्या आयुष्यात ? कोणता बदल झालेला आवडेल? कोणत्या बदलांमुळे जीवनाला अर्थ येईल?

काय असतं सहजीवन म्हणजे ?

शारीरिक संबंध येणार याव्यतिरिक्त काय बदल होणार आहेत ?

जोडीदार समजूतदार असावा म्हणजे नेमकं काय करणारा असावा?

लग्नानंतर नवीन नातं तयार होणार. कसं हवंय हे नातं मला?

नातं जोपासायचं म्हणजे काय करायचं? नातं जोपासण्यासाठी माझं योगदान काय असू शकतं?

एकनिष्ठतेच्या माझ्या कल्पना काय आहेत?

लग्नानंतर माझ्या मित्र मैत्रिणींच स्थान माझ्या आयुष्यात काय असणार आहे?

माझ्या जोडीदाराच्या मित्र मैत्रिणींच स्थान त्याच्या / तिच्या आयुष्यात कसं असलेलं मला आवडेल?

माझ्याकडे माझ्या भावी जोडीदाराबाबत स्वामित्वाची भावना आहे का?

लग्नानंतर माझ्या आणि त्याच्या / तिच्या आई वडिलांचे स्थान काय असणार आहे? दोन्ही बाजूच्या पालकांनी

आमच्या संसारात किती प्रमाणात ढवळाढवळ केली तर ती मला चालणार आहे ?

माझा स्वतःचा शोध घेण्याबरोबरच माझ्या होणाऱ्या जोडीदाराचा शोध घायला मला आवडेल का?

Whether am I ready to explore my partner? एखाद्या माणसामध्ये रस घेणं, त्याला समजून घेणं, त्यच्या मानसिकतेचा विचार करणं इथं खर तर नात्याची सुरुवात होते.

असा विचार करत गेलं तर जोडीदार निवडीची प्रक्रिया रंजक होऊ शकेल आणि मग स्वतःच्या लग्नाचं टेन्शन न येता तो सारा प्रवास एक शोधयात्रा ठरेल. लग्नानंतर माझं आयुष्य आश्वस्त व्हायला हवं, निर्भर व्हायला हवं .लग्नानं माझं आयुष्य enrich , संपन्न व्हायला हवं. लग्नानं माझ्या आयुष्यात value addition व्हायला हवी.

ठरवून केलेल्या विवाहात किमान तीन भेटी तरी व्हायला  हव्यात ( एखादी अजून मिळाली तर अधिक छान.)

असं माझं ठाम मत आहे. या सगळ्या भेटींची तयारी करायलाच हवी. वर लिहिलेले सगळे प्रश्न स्वतःला आधीच विचारायला हवेत.आणि मगच मुलाला / मुलीला भेटायला जावे.

भेटायला जाताना किमान गोष्टी पाळण्याची गरज असते.  त्यातला  सगळ्यात महत्वाचा भाग म्हणजे वेळ पाळणे. वेळ पाळता आली नाही तर समोरच्या व्यक्तीला अपमानास्पद वाटू शकतं. आपला पेहरावही व्यवस्थित असायला हवा. वागणं सौजन्यपूर्ण असायला हवं. अशा प्रकारच्या भेटींमध्ये  बोलण्याचा स्वर ( tone )

आवाजाची पट्टी ही खूप महत्वाची ठरते. किमान पहिल्या भेटीमध्ये तर ह्या गोष्टींकडे लक्ष देण्याची  नितांत गरज आहे.

समोरच्या व्यक्तीला गप्पांमध्ये सामावून घेता आलं पाहिजे. प्रत्येक बोलण्याच्या शेवटी " तुला काय वाटतं ? "

असं विचारल तर वातावरणातला ताण घालवता येऊ शकतो.

अथर्व आणि शाल्मली प्रथम बाहेरच भेटले. सुरुवातीच्या जुजबी बोलण्यानंतर

शाल्मली त्याला म्हणाली, "  मला काय हवंय याबद्दल  मी खूप विचार केलाय. माझ्या होणाऱ्या नवऱ्याने त्याच्या  २४ तासापैकी

मला रोज अर्धा तास द्यायला  पाहिजे. हा वेळ दोघांच्या ऑफिस च्या कामाव्यतिरिक्त असेल. तसच तो बेडरूम व्यतिरिक्तही असेल. याबद्दल तुला काय वाटतं ? "

अथर्व आश्चर्य चकित झाला. तो म्हणाला " का हवाय  तुला  हा वेळ? "

ती म्हणाली," मला  माझ्या जवळच्या माणसांशी गप्पा मारायला आवडतात. त्यातून तो माणूस कळायला सोपं जातं.

रोज गप्पा मारत राहिलं की समोरचा माणूस काय विचार करतो?  अमुक एखाद्या प्रसंगात वागायची त्याची पद्धत कशी आहे, याचा  अंदाज येतो. त्याच्या जवळची माणस कोणती ते समजत. त्यामुळे संवाद सहवास या माझ्या दृष्टीने खूप महत्वाच्या गोष्टी आहेत. तसच पती पत्नी नात्यामध्ये पारदर्शकता असायला हवी असं माझं ठाम मत आहे. म्हणजे माझ्या होणाऱ्या नवऱ्याची एखादी मैत्रीण असेल तर त्याने मला ते सांगितलेच पाहिजे. हा माझा  आग्रह असेल. लपून छपून कोणतीही गोष्ट माझ्या नवर्याने केली तर मला नाही चालणार. भलेही त्याला १५/२० हजार पगार कमी असला तरी चालेल. तुला काय वाटत याबद्दल? "

अथर्व म्हणाला " बापरे , तू किती विचार केला  आहेस?  मी काहीच असा  विचार नाही केलेला. मला परत भेटायला आवडेल तुला. मी माझ्या मनाशी काही विचार करून भेटेन तुला. तुला आवडेल ना परत भेटायला ?"

अशा स्वरुपाची तयारी, अभ्यास केला  तर मिळणाऱ्या दोन किंवा तीन भेटी सुद्धा जोडीदार निवडीसाठी पुरेशा ठरू शकतात.

---

एव्हढी तयारी झाली की मग आता प्रत्यक्ष स्थळ शोधायची तयारी सुरु करायची. स्थळ शोधणं ही पण एक कला आहे. पाहूया पुढच्या लेखात ...........!